RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३४] मंगळवार, ऑगस्ट ३०, २०१६/भाद्र ८, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ४९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.—**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . . . पृष्ठे १–२

दिनांक ११ ऑगस्ट २०१६ रोजी माननीय राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.**

(माननीय राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ३० ऑगस्ट २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९७४ चा २. **ज्याअर्थी,** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** आता, भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १५६ ची सुधारणा.

**२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त संहिता" असा करण्यात आला आहे) त्याच्या कलम १५६ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :— १९७४ चा २.

"परंतु, कोणताही दंडाधिकारी, जी व्यक्ती त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये व्याख्या केल्याप्रमाणे लोकसेवक आहे किंवा होती, अशा लोकसेवक असलेल्या व्यक्तीने आपली पदीय कर्तव्ये पार पाडण्याच्या ओघात कार्य करीत असताना किंवा ते कार्य करणे अभिप्रेत असताना, केलेल्या कार्याच्या संबंधात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९७ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये त्याबाबत पूर्व मंजुरी घेतली असल्याशिवाय अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध या कलमान्वये अन्वेषण करण्याचा आदेश देणार नाही : १९७४ चा २.

परंतु आणखी असे की, मंजुरी प्राधिकारी, मंजुरीसाठी प्रस्ताव मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत त्यावर निर्णय करील, आणि मंजुरी प्राधिकाऱ्याने उक्त विनिर्दिष्ट नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत निर्णय न केल्यास त्या बाबतीत, मंजुरी प्राधिकाऱ्याकडून मंजुरी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.".

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १९० ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम १९० च्या पोट-कलम (१) मध्ये, खंड (ग) नंतर, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

"परंतु, कोणताही दंडाधिकारी, जी व्यक्ती त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये व्याख्या केल्याप्रमाणे लोकसेवक आहे किंवा होती, अशा लोकसेवक असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपली पदीय कर्तव्ये पार पाडण्याच्या ओघात कार्य करीत असताना किंवा ते कार्य करणे अभिप्रेत असताना, अपराध केला असल्याचा आरोप असलेल्या कोणत्याही अपराधाची, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९७ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये त्याबाबत पूर्व मंजुरी घेतली असल्याशिवाय दखल घेणार नाही : १९७४ चा २.

परंतु आणखी असे की, मंजुरी प्राधिकारी, मंजुरीसाठी प्रस्ताव मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत त्यावर निर्णय करील, आणि मंजुरी प्राधिकाऱ्याने उक्त विनिर्दिष्ट नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत निर्णय न केल्यास त्या बाबतीत, मंजुरी प्राधिकाऱ्याकडून मंजुरी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.